GRT

# GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY – 2017




## आर्थिक आणि सहकारी संस्था

**Pro.Dr. Vandana Abhij Bhanap**
**Professor , DBF Dayanand College, Solapur.**

सारांश:-

आर्थिक विकास ही गतीमान व सतत बदलत जाणारी प्रक्रिया आहे. त्याचबरोबर आर्थिक विकास आणि सहकारी बँका यांचे एक अतूट नाते आहे. या प्रकरणामध्ये सहकारी बॅंका, सहकारी नागरी बँका, सेवक सहकारी पतसंस्था आणि राष्ट्रीयकृत बँका यांचा अभ्यास केलेला आहे. या चार मुद्यामधील सर्वच बँकाचा पतसंस्थांचा आणि राष्ट्रीयकृत बँका यांचा तपशीलवार अभ्यास न करता त्यामधील महत्वाच्या संस्था आणि सहकारी संस्था यांचा अभ्यास केलेला आहे. सहकारी बँका यामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहूउद्देशीय विकास बँक मर्यादित, सोलापूर या दोन बँकेचा अभ्यास केलेला आहे. प्राथमिक सहकारी नागरी बँका यामध्ये दि लक्ष्मी को-ऑप-बँक,लि, सोलापूर, जनता सहकारी अर्बन बँक, नि, सोलूपर, यशवंत सहकारी कामगार बँक लि.,सोलापूर, लोकमंगल को-ऑप बँक, लि., सोलापूर, विकास सहकारी बँक,लि., सोलापूर, समर्थ को-ऑप बँक, लि., सोलापूर यांचा अभ्यास केलेला आहे. सेवक सहकारी पतसंस्थाची संख्या १३४ आहे.त्यापैकी सोलापूर दूर संचार कर्मचारी सहकारी पतसंस्था, मर्यादित, सोलापूर पद्मशाली शिक्षण संस्था सेवक सहकारी पतपेढी, मर्यादित, सोलापूर या दोन पतसंस्थाचा अभ्यास केला आहे. सोलापूर शहरात राष्ट्रीयकृत बँकाची संख्या मोठी आहे. त्यापैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ म्हैसूर आणि पंजाब नॅशनल बँक यांची माहिती विचारार्थ घेतली आहे. सोलापूर शहरात सहकारी संस्थाचे योगदान महत्वाचे आह. सहकारी संस्थाचे एक विस्तृत असे जाळे तयार झाले आहे.

### सहकारी संस्थेचे प्रकार व संख्या खालील प्रमाणे आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, व प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था १३, प्राथमिक भूविकास बँक १, प्राथमिक सहकारी नागरी बँका २०, नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था १३४, इतर नागरी पतपुरवठा संस्था ११४, जिल्हा कृषि औद्योगिक पणन संस्था १ व प्राथमिक फळे व भाजीपाला प्रक्रिया संस्था २, प्राथमिक इतर शेतीमाल प्रक्रिया संस्था ३, सहकारी साखर कारखाने १, प्राथमिक इतर शेतीमाल प्रक्रिया संस्था ३, मध्यवर्ती विणकर सहकारी संस्था २, फळे व भाजोपाला सहकारी संस्था १, हस्तकला व्यवसाय सहकारी संस्था १, सामान्य यंत्रद्योग सहकारी संस्था १५, रासायनिक यंत्रद्योग सहकारी संस्था ४, बांधकाम माल उत्पादन सहकारी संस्था १५, रेशिम किडे उत्पादन सहकारी संस्था १, दोरखंड उत्पादन सहकारी संस्था १, बलुतेदार सहकारी संस्था ८०, सूत गिरण्या कापसू उत्पादकांच्या सहकारी संस्था ५, सहकारी औद्योगिक वसाहती संस्था १ , मध्यवर्ती ग्राहक भांडार सहकारी संस्था १०, प्राथमिक ग्राहक भांडार सहकारी संस्था १७१, फक्त सभासदासाठी असलेली प्राथमिक ग्राहक भांडार संस्था ३, विद्यार्थ्यांच्या सहकारी भांडार संस्था ३, गृहनिर्माण सहकारी संस्था (नागरी) ४५८, मजूर सहकारी संस्था (बिगर आदिवासींच्या)१०६, वाहतूक संस्था (रिक्षा ओढणारे सोडून) इतरांच्या ७, इतर सहकारी संस्था (शेती) १, सहकारी दवाखाने ५, इतरांच्या सहकारी संस्था (बिगरशेती)८६, जिल्हा सहकारी मंडळे १, जिल्हा संवर्गीकरण सहकारी संस्था (देखरेख)१, पाणीपुरवठा सहकारी संस्था (उपसा जलसिंचन) १,

गृहनिर्माण संस्थाची जिल्हा पातळीवरील संस्था १, मजूर कंत्राट संस्थाची जिल्हा पातळीवरील संस्था १, आणि इतर संस्थाचे जिल्हा पातळीवरील संस्था ४ अशा एकूण १,६१५ संस्था कार्यरत आहेत. या सहकारी संस्थेच्या विश्वात जिल्हा औद्योगिक सहकारी बँकही महत्वाची आहे. सोलापूर शहरात औद्योगिक बँकेने औद्योगिक प्रगतीला मोठा हातभार लावला आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातही या बँकेच्या एकूण १२ शाखा ग्राहकाना सेवा पुरवित आहेत.

वरील सर्व सहकारी संस्थापैकी प्राथमिक शेती पुरवठा संस्था, प्राथमिक सहकारी नागरी बँका, नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था, इतर नागरी पतपुरवठा संस्था, प्राथमिक हातमाग कापूस सहकारी संस्था, प्राथमिक यंत्रमाग कापूस सहकारी संस्था, सामान्य यंत्रमाग सहकारी संस्था, बांधकाम माल उत्पादन सहकारी संस्था, बलुतेदार सहकारी संस्था, प्राथमिक ग्राहक भांडार सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, इतर बिगर शेती सहकारी संस्था, इत्यादि संस्थाना सोलापूरवासीयानी चांगला प्रतिसाद दिला आहे.

इ.स. १९४६ मध्ये यासाठी कायदे करण्यात आले. याचा परिणाम होणारी पिळवणूक थांबली. मात्र याच दरम्यान (Indian Central Banking Inquiry Committee 1931) हा कायदा करण्यात आला.

जेव्हापासून पैसा आला तेव्हापासून व्याजभट्ट्याचा व्यवसाय आला असे इतिहास सांगतो. सोलापूर शहरात हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असे. इ.स. १९२९ मध्ये सोलापूरात एकूण ३ बँका होत्या .

१) इम्पिरियल बँक म्हणज सध्याची स्टेट बँक
२) दि सोलापूर डिस्ट्रीक सेंट्रल को-ऑप. बँक लि.
३) दि सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया.

## १) बँकींग क्षेत्राचा उद्देश

१) मध्यम व कनिष्ठ वर्गीयात धनसंचयवृत्ती वाढ व्हावी.
२) संचयित धन बँकेत ठेवले जावे.
३) गरजूंना आर्थिक सहाय्य योग्य व्याज दराने उपलब्ध व्हावे.
४) व्यापार उद्योगास चालना मिळावी.
५) मुला-मुलींची लग्ने, शिक्षण पैशाकरीता आडू नये.
६) लहान सहान व्यापाराला पैशाची मदत व्हावी.

या उद्देशाने सोलापूरातील बँकींग व सहकारी क्षेत्राने प्रगती केली व झपाट्याने यामध्ये वाढ झाली. यापैकी सहकारी बँका, पतसंस्था, शासकीय बँक, निमशासकीय बँका, वैयक्तिक बँका सोलापूरच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदानाचा अभ्यास यामध्ये केला आहे.

## सहकारी संस्था इतिहास

मानवी जीवनाची मानसिक संपन्नता व ऐहीक समृध्दीही सहयोगानेच साधली जाते आणि म्हणूनच एकासाठी अनेक व अनेकांसाठो एक (one for all & all for one) या तत्वावर सहकारी संस्थांची स्थापना झाली. इ.स.१६९५ मध्ये जॉन बेलस©(John Bellers ) याने या विषयाववर एक पुस्तक लिहिले. रॉबर्ट वोवेन यांनी हे पुस्तक वाचले. त्यानंतर या तत्वाला त्यांनी 'सहकार ' co-operation हे नाव प्रथम दिले. दि. २१-१२- १८४४ रोजी २८ कामगार एकत्र येवून 'Equitable Pioneers Co-operative Society' प्रथम स्थापित केली . इ.स. १८४८ मध्ये रायटसन याने गरीब लोकांना मदत करण्यासाठी जर्मनीमध्ये सहकारी संस्थेची स्थापना केली. इ.स. १८४९ मध्ये डेलिट्ज (Dellituz) याने जर्मनीमध्येच प्रॉव्हीडेंट फड सहकारी संस्थेची स्थापना केली.

## सहकारी संस्थेचा पहिला कायदा (The First Cooperative Act):

इ.स. १८९२ मध्ये मद्रास सरकारने फड्रीक निकोलसन याला युरापेमध्ये ग्रामीण सहकारी संस्थेच्या अभ्यासासाठी पाठविले. दौरा करुन आल्यानंतर त्याने यावर आधारीत माहिती रायफसन शोधो (Rayfason Shodho) या नावाचे पुस्तक प्रसिध्द केले आणि भारतामध्ये अशा संस्थांची स्थापना होणे गरजेचे आहे असे सुचविले आणि म्हणून इ.स. १९०१ मध्ये सर एडवर्ड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती (committee) स्थापित झाली . या समितीने जो अहवाल सादर केला त्यामध्ये अशा सहकारी संस्था या मोठ्या प्रमाणात लोकांना मदत करु शकतील. त्यामुळे अशा संस्था स्थापित होणे फायद्याचे आहे असे स्पष्ट केले.

समितीच्या अहवालानुसार हा सहकारी संस्थेचा कायदा मुंबई प्रोव्हीनन्स द्वारे दि. ४-५-१९०४ रोजी संमत झाला. तो अहमदाबाद, पुना, अहमदनगर, सोलापूर आणि धारवाड येथे अमलात आला.

दि. ८-५-१९०५ रोजी पहिली सहकारी संस्था कानीनगल (Kaninghal) या धारवाड जिल्ह्यातील खेडयात स्थापन झाली.

हा कायदा फक्त सहकारी पतंसस्थेसाठीच लागू होता. यामध्ये खते, औषधे, कापूस, कुटीर उद्योग यांचा समावेश नसल्याने याची देवाण-घेवाण यामार्फत होवू शकत नव्हती. इ.स. १९१२ मध्ये सुधारणा करुन सहकारी पतपेढ्या, पतसंस्था, दुग्ध विकास संस्था, इन्श्युरन्स, गृह संस्थांचा समावेश करण्यात आला.

इ.स. १९१९ पासून भारत सरकारने (अर्थात ब्रिटोश सरकारने) हा कायदा राज्य शासनाच्या अधिपत्याखाली आणला.

## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थेची चळवळ

संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य सहकार क्षेत्रात अग्रगण्य आहे. या क्षेत्रात महाराष्ट्र राज्याने जलद गतीने प्रगती केली. इ.स. १९२१ मध्ये डॉ. मन (Mann) यानी सर्वप्रथम शेतकरी सहकारी संस्थेची स्थापना सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यात केली. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी इ.स. १९४९ मध्ये भारतातील पहिली सहकारी साखर कारखान्याची सुरुवात प्रवरानगर येथे केली. बघता-बघता अनेक सहकारी संस्थांची स्थापना महाराष्ट्रात होत गेली. इ.स. १९९०-९१ पर्यंत शेतकरी सहकारी संस्था १८,२९१, सहकारी बाजारी पतसंस्था ९०४, सहकारी साखर कारखाने १३६, सहकारी दुध संस्था १३,३९९ असे सहकारी संस्थेचे खूप मोठे जाळे निर्माण झाले. यामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे. शहरी व गामीण भागात रोजगाराची संधी यामुळे उपलब्ध झाली .

तक्ता क्र.१

खालील तक्त्यात सोलापूरातील काही सहकारी संस्था, दाखवल्या आहेत.

| अ.क्र. | सांकेतांक | संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| १ | १३०२ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ०१ |
| २ | २४०५ | प्राथमिक भूविकास बँका | ०१ |
| ३ | ३४०१ | प्राथमिक सहकारी नागरी बँका RBI Act 1949 | २३ |
| ४ | ३४०५ | नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था | १३४ |
| ५ | ३४०७ | इतर नागरी पतपुरवठा संस्था | १३९ |

**आधार** : उपनिबंधक सहकारी संस्था, नोंदणी प्रत, पृ. १,२,३,८

वरील तक्त्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व भुविकास बँक यांची प्रत्येकी एक बँक आहे. तथापि, सहकारी नागरी बँका, नोकरदाराच्या पतपुरवठा संस्था व इतर नागरी पतपुरवठा संस्था यांच्या अनुक्रमे २३,१३४ व १३९ आहेत.

आर्थिक आणि सामाजिक विकासाचा मूळ कणा म्हणजे सहकार. सहकार ही मानवी सहजीवनाच्या संकल्पनेची एक आदर्श व्यवस्था आहे. लोकशाही चारित्र्य बंधुभाव शांतता आणि प्रगती या अधिष्ठानावर सहकारी चळवळीची इमारत उभी आहे. 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' हे सहकाराचे मुख्य सूत्र आहे आणि हाच सहकाराचा उगम आहे. सहकाराची व्याप्ती प्रचंड व अमर्याद आहे. संगणक युगात देखील सहकाराचे महत्व कमी होत नाही . आपल्या भारतात शेती हा परंपरागत व्यवसाय आहे. इंग्रज कालखडात इंग्रजांनी याच व्यवसायाला दुर्बल शेती व्यवसाय म्हटले आहे. निसर्गाने देऊन ही देश दरिद्री राहिला. नद्यांच्या पाण्याचा उपयोग करता येत नसल्याने सतत निसर्गावर अवलंबून राहावे लागे. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ त्यामुळे भारतातील शेतकरी हा कर्जातच मरता. अशी केवळ म्हणच नव्हे तर कठोर वास्तवता आहे. कर्जाची फड करणे त्याला आयुष्यभर शक्य होत नाही. या शेतकऱ्याला सावकारी पाश्यातून मुक्त करावे म्हणून सहकार चळवळ निर्माण झाली.

## २) सहकारी बँका

### १) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक , १९१८

सोलापूरमध्ये इ.स. १९१८ मध्ये या बँकेची स्थापना करण्यात आली. गरजूना आर्थिक साहाय्य, व्यापार उद्योगास चालना मिळावी या उद्देशाने या बँकेची मुहूर्तमेढ रोवली गेली. या बँकेचे पहिले व्यवस्थापक श्री त्र्यंबक जनार्दन पीत्रे आणि श्री नरहर पुरुषोत्तम खाडीलकर हे पहिले कारकून होते .

शहराबरोबर ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासात या बँकेने महत्वाचे योगदान दिले आहे. आरबीआय (R.B.I.), एसबीआय (S.B.I), सरकार आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी, हातमाग, (हस्तकला) जमीनरहित मोलमजुरांसाठी महत्वाचा दुवा ठरला .

सोलापूर शहर व जिल्ह्यातील संस्थांना व्याज पुरविणे.ही कामे या बँकेला करावी लागत होती. तसेच भागभांडवलाचा बॅलन्स ठेवणे, क्रेडीट सोसायटीवर देखरेख करणे आणि क्रेडिट सोसायट्यांचा विकास करणे ही कामे देखिल करावी लागत होती.

To Keep balance of surplus capital.
To superviese affiliated credit societies.
To develop credit societies in Solapur district.

सहकारी बँकींग क्षेत्रामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महत्वाचे स्थान बजावले आहे. या बँकेला अनेक सहकारी संस्थाचे प्रतिनिधीत्व करणारी बँक असेच म्हणावे लागेल. भाग भांडवल वाढवून, कर्ज दणे व समतोल राखणे या प्रमुख उद्देशाने या बँकेने प्रगती केली व यासाठी सोलापूर शहराबरोबर ग्रामीण भागात सुध्दा विविध ठिकाणी शाखा उघडल्या. सुरुवातीला जमिनीच्या कागदपत्रांवरती कर्ज मंजूर होत होते. मात्र वाढत्या मागणीकडे पाहून गोटवाला समितीने यावर विचार करुन कर्ज देणेसाठी योग्य कारण असल्यास कर्जवाढीला मंजूरी देण्याचे अधिकार बँकेला दिले. यामुळे शेतकऱ्यांना याचा विशेष लाभ होवून जास्तीत जास्त कर्ज मिळत गेले. त्याचप्रमाणे या बँकेने आपले व्याजदर इतर बँकेपेक्षा कमी ठेवल्यानेदेखील अनेकांस याचा फायदा झाला.शेतकऱ्याबरोबर , उद्योजक, इतर संस्था, शासकीय कर्मचारी, उद्योगधंदे यांचा ओढा बँकेकडे वाढला. गृह, वाहन, उद्योगासाठी लागणारे कर्ज, मुदत ठेव योजना व अशा अनेक आर्थिक सुविधा या बँकेमार्फत देण्यात येत आहेत . या बँकेच अध्यक्षपदी अकलूज येथील शंकरराव मोहिते पाटील यांची सलग चौथ्या वर्षी निवड झाली होती . त्यांच्या काळात बँकेने चांगली प्रगती केली होती.

### बँकेची वैशिष्ट्ये

इ.स.१९९५-९६ या वर्षाचे राष्ट्रीय बँकेचे (नाबार्ड) पारितोषिक व रुपये पाच लाखाचे (कर्मचारी कल्याण निधी) बक्षिस विजेती बँक ठरली. इ.स. १९९५-९६ आणि इ.स. १९९६-९७ साठी पश्चिम महाराष्ट्र स्टेट को-ऑप-बँकेस असोसिएशनचे जिल्हा बँक गटातील प्रथम पुरस्कार विजेती बँक आहे. संलग्न शेती सहकारी कर्जदार सभासदास, जनता अपघात विमा पॉलीसीची सुविधा कमीत कमी अंतरावर उपलब्ध या प्रमुख हेतूने २१० शाखाद्वारे कार्यरत आहे. शासनाच्या विविध योजनाद्वारे दारिद्रय निर्मूलनाच्या राष्ट्रीय कार्यात या बँकेचा भरीव सक्रीय सहभाग आहे. शेतीमालाच्या विविध प्रक्रिया संस्थाना पात्रतेद्वारे, पुरेसा गरजेनुसार पतपुरवठा करणारी बँक आहे. प्रामुख्याने शेती व शेतीपुरक कारणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक साहाय्य करुन ग्रामीण विकासासाठी सतत प्रयत्नशील राहणारी बँक आहे. उत्कृष्ठ कार्यप्रणालीबद्दल इ.स. २०००-०१ साठीचे राष्ट्रीय बँकेचे (नाबार्ड) पारितोषिक या बँकेने पटकावले आहे.

### २) सोलापूर जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक, मर्यादित, सोलापूर, १९५९

दि. ७-१०-१९३५ रोजी मुंबई राज्य सहकारी भूतारण बँक, मर्या, या नावाने या बँकेची सुरुवात झाली . या अंतर्गत भूतपूर्व सोलापूर जिल्हा भू-विकास बँकेची स्थापना सोलापूर शहरामध्ये दि. १-१-१९५९ रोजी झाली होती. तत्कालीन बँकेचे अध्यक्ष श्री कि.रा. मारवाडी उर्फ मर्दा वकील, मंगळवेढा व सहकार महर्षि कै. श्री शंकरराव नारायण मोहिते-पाटील यांनी बँकेच्या कामकाजाची धुरा समर्थपणे सांभाळली. इ.स. १९६६ मध्ये भू विकास बँकेने शेतकऱ्यांना इंजिन व विहीरीसाठी अनुदान दिले होते . इ.स. १९६७ मध्ये मोहिते पाटील गटाच्या ८ जणाची या बँकेवर बिनविरोध निवड झाली. बँक मोहिते गटाच्या ताब्यात राहिली . स्थापनेपासून इ.स. १९७३ पर्यंत बँकेचे फडरल स्ट्रक्चर होते. दरम्यान जिल्हा भूविकास बँक, शिखर बॅकेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वटहुकूमानुसार दि. १-५-१९७३ पासून विलीन करण्यात आली. अर्थात इ.स.१९७३ पासून बँकेचे युनिटरी स्ट्रक्चर अस्तित्वात आले. दि १-१०-२००१ पासून पुन:श्च जिल्हा स्तरावरील ‘सोलापूर जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ’ या नावाने अस्तित्वात आली. पुन्हा फडरल स्ट्रक्चर अस्तित्वात आले .

### ३) प्राथमिक सहकारी नागरी बँका

सहकारी सहयोग व सहकार्य प्रणाली ही भारतीयांचीच नव्हे तर मानवमात्राची मूल प्रेरणा, अंतरीक धारणा आहे. याच तत्वाने सोलापूर शहरात प्राथमिक सहकारी नागरी बँकांची मुहूर्तपेढ रोवण्यात आली. इ.स. १९०५ पासून खऱ्या अर्थाने भारतामध्ये बँकींग व्यवसायाची सुरुवात झाली. पूर्वी सांगितल्याप्रमाण इ.स. १९२९ पर्यंत सोलापूरात केवळ ३ बँका होत्या. इ.स. १९९२ पासून २००२ पर्यंत सोलापूर शहराच्या वाढीबरोबर सहकारी नागरी बँकांची संख्या व कार्यक्षेत्र वाढीस लागले.

इ.स. २००२ पर्यंत प्राथमिक सहकारी नागरी बँका आरबीआय ॲक्ट (RBI Act) १९४९ नुसार प्रगती होवून त्यांचो संख्या २३ वर पोहोचली आहे. शिवाय या बँकांच्या उपशाखेचादेखील विस्तार झालेला पहावयास मिळतो.

तक्ता क्र.२१

खालील तक्त्यात इ.स. १९२९ ते २००२ या काळातील बँकांची संख्या दाखविली आहे.

| अ.क्र. | वर्ष | बँकाची संख्या |
|---|---|---|
| १ | १९२९ | ०१ |
| २ | १९३७ | ०२ |
| ३ | १९६५ | ०३ |
| ४ | १९७० | ०४ |
| ५ | १९७१ | ०५ |
| ६ | १९७४ | ०६ |
| ७ | १९७६ | ०७ |
| ८ | १९८७ | ०८ |
| ९ | १९९६ | १० |
| १० | १९९७ | १७ |
| ११ | २००२ | २३ |

**आधार**:- उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर नोंदणी पुस्तक पृ.२

वरील तक्त्यात इ.स. १९२९ पसून २००२ पर्यंत सोलापूरमध्ये प्राथमिक सहकारी नागरी बँकाची संख्या ०१ पासून २३ पर्यंत सातत्याने वाढत गेल्याचे स्पष्ट होते.

## संदर्भ

१) उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, सोलापूर, नोंदणी टिपणी.पृ.क्र.२.
२) अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन , मुंबई, सोलापूर जिल्हा, १९९२-९३, पृ. ११२.
३) लक्ष्मी कॉटन मिल, सोलापूर, वार्षिक अहवाल, १९३१-१९४०.
४) दि लक्ष्मी को-आपरेटोव्ह बँक, सोलापूर, अमृतस्मृति ग्रंथ, २००३-०४, पृ.१.
५) प्रकाश टंडन, बँकिंग सेंच्युअरी पेनजीयूश्न बुक्स प्रकाशन, १९८९, न्यु दिल्ली , पृ. ४७-४८.
६) दि लक्ष्मी को-आपरेटीव्ह बँक, तत्रैव,पृ.१,२.
७) दि लक्ष्मी को-ऑप बँक, सोलापूर, तत्रैव, २००३-०४, पृ.२.
८) हिराचंद नेमचंद कॉलेज आफ कॉमर्स, एमबीए डिपार्टमेंट, सोलापूर, कंपनी प्रोफाईल, स्टेट बँक ऑफ इंडिया,१९७३, सोलापूर.पृ.६ -८.
९) तत्रैव.
१०) गॅझेटियर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रीक्ट, रिवाईज्ड एडिशन, १९७७, पृ. ११२.